S.N.D. POLYTECHNIC, BABHULGAON
CENTRAL LIBRARY
YEOLA DIST. NASHIK

Please Consider the Environment Before Printing…

**Date: 10/03/2025**

## Activity Name: Day Special

## दिन विशेष

**News Paper Name: आपलं महानगर**

**Page No. 04**

# दिनविशेष



## कविवर्य मंगेश पाडगावकर

कविवर्य मंगेश पाडगावकर त्यांचा जन्म १० मार्च १९२९ रोजी वेंगुर्ले येथे झाला. मराठी आणि संस्कृत विषय घेऊन 'एम.ए' झालेल्या पाडगावकर यांनी दोन वर्षे महाविद्यालयात अध्यापक म्हणूनही काम केले. १९५३ ते १९५५ ही दोन वर्षे पाडगावकर यांनी 'साधना' साप्ताहिकात सहसंपादक म्हणून काम केले. मुंबई आकाशवाणीवर १९६४ ते १९७० या कालावधीत निर्माता म्हणूनही त्यांनी काम केले. त्यांची 'या जन्मावर, या जगण्यावर शतदा प्रेम करावे', 'भातुकलीच्या खेळामधली', 'शुक्रतारा मंद वारा' ही गाणीही खूप गाजली. प्रेम म्हणजे प्रेम असतं, तुमचं आमचं अगदी 'सेम' असतं, ही त्यांची कविताही विशेष गाजली होती. 'जिप्सी', 'छोरी', 'उत्सव', 'विदुषक', 'सलाम', 'गझल', 'भटके पक्षी', 'बोलगाणी' हे पाडगावकर यांचे काव्यसंग्रह प्रसिद्ध आहेत. पाडगावकर यांनी 'गझल', 'विदुषक', 'सलाम' या काव्यसंग्रहातून राजकीय आशयाची व उपरोधिकपणा असलेली समाजातील विसंगतीवर प्रहार करणारी कविता केली.

'बोलगाणी' हा पाडगावकर यांनी काव्यरचनेवर केलेला एक वेगळा प्रयोग आहे. पाडगावकर यांचे 'भोलानाथ, 'बबलगम', 'चांदोमामा' हे बालकविता संग्रह प्रसिद्ध आहेत. १९६४ मध्ये प्रकाशित झालेला 'वात्रटिका'हा त्यांचा कवितासंग्रह पाडगावकर यांची एक वेगळी ओळख करून देणारा ठरला आहे. पाडगावकर यांनी 'बायबल'ग्रंथाचा मराठी अनुवाद केला होता. २०१३ मध्ये त्यांना पद्मभूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते. २००८ मध्ये त्यांना राज्यातील प्रतिष्ठेचा महाराष्ट्र भूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. १९८० मध्ये त्यांच्या सलाम या कविता संग्रहाला साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळाला होता. अशा या थोर कवीचे ३० डिसेंबर २०१५ रोजी निधन झाले.

Nashik Edition
Mar 10, 2025 Page No. 4
Powered by: erelego.com

LIBRARIAN
MR.U.D. MULANI
SND POLYTECHNIC
YEOLA-423401

PRINCIPAL
PROF.U.B JADHAV
SND POLYTECHNIC
YEOLA-423401